# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक ः
०२०-२५६९१३४१, २५६०१२०६

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
फॅक्स ः ०२०-२५६०१२०६
०२०-२५६९१३४१
Website : www.unipune.ac.in
e-mail : coe@unipune.ac.in

परीक्षा-समन्वय/३०४ दि. १२.०३.२०११

**गोपनीय महत्वाचे**

प्रति,

१. मा.पोलीस आयुक्त,
 पुणे शहर / नाशिक शहर

२. मा.पोलीस अधिक्षक,
 पुणे जिल्हा/ अहमदनगर जिल्हा व नाशिक जिल्हा

विषय- विद्यापीठ परीक्षा मार्च, २०११ ते जुलै, २०११ सत्र.

महोदय,

पुणे विद्यापीठाच्या निरनिराळया परीक्षा पुणे, नाशिक, अहमदनगर शहर व जिल्हयातील विविध परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात येतात. सन २०११ च्या प्रथमार्धात होणा-या विद्यापीठाच्या लेखी परीक्षा दिनांक २३ मार्च,२०११ पासून सुरु होत आहेत. या परीक्षा विद्यापीठाची संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था मधून सुमारे ४०० परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात येत आहेत.

विद्यापीठामार्फत मार्च, २०११ ते जुलै, २०११ या कालावधीत आयोजित करण्यात येणा-या निरनिराळया परीक्षांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. तसेच संबंधित परीक्षा केंद्रेही जाहीर केलेली आहेत. सदर कार्यक्रमपत्रिकेच्या व परीक्षा केंद्रांची यादी (विद्यापीठ परिपत्रक क्र. **१९५/२०१० व क्र.१९६ /२०१० दिनांक २८/१०/२०१०** ) या पत्रासोबत अवलोकनार्थ, माहिती व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी पाठवीत आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा अत्यंत शिस्तबध्द व निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी संबंधित परीक्षा केंद्र प्रमुख- प्राचार्य / वरिष्ठ पर्यवेक्षक यांना तसेच विद्यापीठाला पोलिस विभागाची यापूर्वी आवश्यकतेनुरुप मदत झालेली आहे, तशीच मदत सन २०११ च्या प्रथमार्धात होणा-या विद्यापीठाच्या निरनिराळया परीक्षांच्या आयोजनाचे वेळीही उपलब्ध व्हावी म्हणून आपणास हे पत्र लिहित आहे.

..२..

तरी कृपया विद्यापीठाच्या उपरोक्त परीक्षा चालू असेपर्यंतच्या कालावधीत शहरांच्या व जिल्हयातील संबंधित परीक्षा केंद्राच्या ठिकाणी तसेच ग्रामीण भागातील परीक्षा केंद्राच्या केंद्र प्रमुख, प्राचार्य व वरिष्ठ पर्यवेक्षक यांना गरजेनुसार पोलिस मदत उपलब्ध करुन दयावी व तशा सूचना आपल्या विभागातील सर्व संबंधितांना द्याव्यात अशी विनंती आहे.

विद्यापीठाच्या निरनिराळया परीक्षा सुरळीत आणि शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी आपण विद्यापीठास वेळोवेळी सहकार्य केलेले आहेच, ते यापुढेही मिळत राहील असा मला विश्वास आहे .

कळावे,
धन्यवाद.

सोबत- वरीलप्रमाणे

आपला विश्वासू,

(डॉ. शि.मो. आहिरे)
परीक्षा नियंत्रक

प्रत अवलोकनार्थ माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना-:

१. मा.प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये
२. मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था
३. मा. विभागप्रमुख, विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे-७.

यांना विनंती की विद्यापीठाच्या परीक्षा शिस्तबध्द व निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यकतेनुसार आपण आपल्या नजिकच्या पोलिस ठाण्याशी संपर्क साधून जरुरीनुसार पोलीस मदत उपलब्ध करुन घ्यावी.